महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==========================================================================

जावक क्रमांक – ४०१८/५५ दिनांक :- ०९ ऑक्टोबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी निविदा प्रसिद्ध

मुंबई, दि. ०९ ऑक्टोबर, २०२४ :- अभ्युदय नगर (काळाचौकी) म्हाडा वसाहतीच्या समहू पुनर्विकासासाठी बांधकाम व विकास (Construction & Development) या तत्वावर विकासक नेमण्यासाठी मुंबई मंडळातर्फे निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

शासनाच्या उच्चाधिकार समितीने दिलेल्या मान्यतेनंतर पुनर्विकास प्रकल्पाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. अभ्युदय नगर, काळाचौकी वसाहतीत १,३३,५९३ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर सद्यस्थितीत ४८ इमारती असून २०८ चौरस फूट आकारमानाच्या ३४१० सदनिका आहेत. सुमारे १५ हजार रहिवाशांना या पुनर्विकास प्रकल्पाचा फायदा होणार आहे. अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या या इमारतींच्या विकासाची जबाबदारी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडे सोपविण्यात आली आहे. त्यानंतर मंडळातर्फे अभ्युदय नगर वसाहतीचा पुनर्विकास प्रक्रिया सी अँड डी प्रारूपानुसार करण्याचा निर्णय घेण्यात आला. अनेक वर्ष प्रलंबित राहिलेल्या या प्रकल्पाचा तिढा उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मध्यस्थीने सुटला.

अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाची निविदा काढतांना उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या सूचनेनुसार या पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसन सदनिकेचे चटई क्षेत्रफळ किमान ६३५ चौरस फूट असावे, भविष्याच्या दृष्टीने प्रत्येक सदनिकाधारकाला चारचाकी वाहन पार्किंग असावी, अशा अटी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. प्रत्येक सदनिकाधारकाला पाच लाख रुपये कोर्पस फंड एकदाच देण्याची अट निविदेत आहे. प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रति सदनिकाधारक वीस हजार रुपये प्रति माह भाडे विकासकाने देण्याचीही अट देखील या निविदेत टाकण्यात आली आहे.

म्हाडाचे उपाध्यक्ष श्री. संजीव जयस्वाल यांनी गेल्याच महिन्यात अभ्युदय नगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पाचे सादरीकरण येथील रहिवाशांसमोर करुन प्रकल्पाविषयी माहिती दिली होती. निविदा वेळापत्रकानुसार तांत्रिक बोली निविदा २२ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येणार आहे.

###

(वैशाली गडपाले)

मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==============================================================================

Outward No. : 4018/55 Dt. 9th October, 2024

Press Release

# Tender Issued for cluster redevelopment of Abhyudaya Nagar Colony

Mumbai, October 9, 2024: The Mumbai Board of MHADA has released a tender for the comprehensive redevelopment of the Abhyudaya Nagar MHADA Colony, located in Kala Chowki. This tender, issued under the Construction and Development (C&D) model, aims to appoint a developer to undertake the large-scale redevelopment of the colony.

This significant step follows the approval from the government's High-Level Committee, allowing the long-awaited redevelopment project to proceed. Presently, the Abhyudaya Nagar colony occupies an expansive area of 133,593 square meters, with 48 buildings comprising 3,410 tenements, each measuring 208 square feet. The redevelopment will benefit approximately 15,000 residents, bringing much-needed improvement to their living conditions after years of anticipation. The responsibility for the execution of this project has been assigned to MHADA's Mumbai Board.

The redevelopment project, which had been stalled for several years, found new direction through the intervention of Deputy Chief Minister Shri. Devendra Fadnavis, who played a pivotal role in resolving the impasse. Following his involvement, MHADA made the decision to implement the redevelopment under the C&D framework, marking a crucial breakthrough in addressing the long-pending project.

In accordance with the directives issued by Deputy Chief Minister Shri. Devendra Fadnavis, the tender for this redevelopment project has been structured to ensure significant benefits for the residents. Each rehabilitated tenement will have a minimum carpet area of 635 square feet, offering substantial upgrades from the current units. Additionally, provisions have been made for four-wheeler parking, ensuring that each resident has access to future-proof facilities. The tender also mandates the developer to provide a one-time corpus fund of ₹5 lakh to each resident as part of the redevelopment

benefits. Furthermore, until the project reaches completion, the developer is required to pay ₹20,000 per month as rent to each resident.

In a recent meeting, MHADA Vice President Shri. Sanjeev Jaiswal presented the redevelopment plan to the residents of Abhyudaya Nagar. During the presentation, Shri. Jaiswal provided a detailed overview of the proposed project and addressed various concerns raised by the residents, ensuring transparency and clarity on the upcoming changes.

As per the tender schedule, technical bids are set to be opened on November 22, 2024, at 3:00 PM.

This redevelopment project is expected to transform the lives of thousands of residents, providing them with modern amenities, expanded living spaces, and a renewed community infrastructure after years of delays.

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA